महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/209 दिनांक 13 मे, 2020

**-: सुधारीत आदेश :-**

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने करोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केलेला आहे. तसेच करोना विषाणूचा प्रसार जळगांव जिल्हयात गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे, यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, जळगांव जिल्हयातील रुग्णांची वाढती संख्या पाहता, जळगांव जिल्हयातील Covid Care Centres , Covid Health centres, Dedicated Covid Hospitals मधील सोयी सुविधांच्या अनुषंगाने नियंत्रण व समन्वय ठेवण्याकरीता तसेच रुग्णांना यथोचित आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे माझे मत झालेले आहे.

त्याअर्थी, जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग म्हणून **मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती कायदा 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयासाठी आरोग्य सुविधांचे वर्गीकरण त्रिस्तरीय रचना करण्यासाठी, आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याकरीता व सक्षम प्राधिकारी म्हणून आवश्यक ते सर्व अधिकार प्रदान करण्याकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

1) **श्री. सतीष कुलकर्णी, आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव** यांची जळगांव शहर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता आरोग्य सुविधांचे त्रिस्तरीय वर्गीकरण करणे व सर्व संबंधित यंत्रणा, घटक यांचेशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता **'Incident Commander'** म्हणून घोषित करत आहे.

2) **श्री. गोरक्ष गाडीलकर, अध्यक्ष, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जळगांव** यांची जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून, उर्वरीत जळगांव जिल्हा (नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्रासह) कार्यक्षेत्राकरीता

Scanned with CamScanner

आरोग्य सुविधांचे त्रिस्तरीय वर्गीकरण करणे व सर्व संबंधित यंत्रणा, घटक यांचेशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता **'Incident Commander'** म्हणून घोषित करत आहे.

3) उपरोक्त नमूद **'Incident Commanders'** यांनी Covid Care Centres करीता एका अधिका-याची स्वतंत्र नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिका-यांनी वेळोवेळी **'Incident Commanders'** यांचेशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करावी.

4) उपरोक्त नमूद **'Incident Commanders'** यांनी Containment Zone म्हणून घोषित करण्यात आलेल्या क्षेत्राकरीता एका अधिका-याची स्वतंत्र नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिका-यांनी वेळोवेळी **'Incident Commanders'** यांचेशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रमाणे नमूद **'Incident Commanders'** यांनी त्रिस्तरीय रचनेकरीता आवश्यक ते मनुष्यबळ, खाजगी रुग्णालये, साधन सामग्री व उपकरणे, रुग्णवाहिका, शासकीय व खाजगी वाहने, शववाहिका आवश्यकतेप्रमाणे अधिग्रहीत करावेत. तसेच Covid-19 च्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यक असणारे सर्व आदेश/निर्देश/सुचना त्यांचे स्तरावरुनच संबंधितांना निर्गमित करण्यात यावेत.

**आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 नुसार 'Incident Commanders' यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये, कोणत्याही शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापना / यंत्रणा, अत्यावश्यक सेवांशी संबंधित सर्व आस्थापना यांनी 'Incident Commanders' यांच्या निर्देशांचे पालन करण्यात कसूर केल्यास, सर्व संबंधितांवर नमूद कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे अधिकार वर नमूद केल्यानुसार संबंधित 'Incident Commanders' यांना राहतील.**

उपरोक्त नमूद अधिकारी यांनी सदर आदेशाचे तात्काळ अंमलबजावणी करुन करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने जबाबदारीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

सदरचा आदेश हा आज दिनांक 13/05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. श्री. गोरक्ष गाडीलकर, अध्यक्ष, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जळगांव
2. श्री. सतीष कुलकर्णी, आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
3. पोलीस अधिक्षक जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
7. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
8. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
9. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व

**प्रत :-** जिल्हा माहिती अधिकारी जळगांव यांनी सदरील आदेशाचे सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी द्यावी

Scanned with CamScanner